वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय.
संचेती चेंबर्स समोर, मुल रोड, चंद्रपूर - ४४२ ४०१ (म.रा.)
फोन कमांक - (०७१७२) २५१४१४ ई-मेल - [illegible] फॅक्स क्र. - (०७१७२) २७७११६

विषय :- ताडोबा राष्ट्रीय उद्यानाजवळ बांधण्यात येणाऱ्या पर्यटक संकुलाबाबत तक्रार.

क्रमांक:- कक्ष-३(१)/खर्च/०९-१०/ 638
चंद्रपूर, दिनांक ~~११/०९/२००९~~ 11/02/2010

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य,
नागपूर

संदर्भ :- १) या कार्या. पत्र क्र. कक्ष-३(१)/खर्च/३९८, दि. १६/९/२००९.
२) समकक्ष पत्र क्र. ४८३, दि. १५/१०/२००९
३) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१(अ)/योजना/१०००, दि. ४/११/०९
४) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१(अ)/लले/तक्रार/६७७. दि. ६/२/१०.

***

संदर्भिय पत्राचे अनुषंगाने सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) संस्थेला दिलेल्या कामाबाबत :- सन २००८-०९ या आर्थिक वर्षात ग्रामपयोगी विज्ञान केंद्र दत्तपूर वर्धा यांना ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटन योजनेअंतर्गत मिळालेल्या निधीतुन विविध २० कामे एकुण रक्कम रु. ८५२९४०४/- ची देण्यात आली होती. याबाबत कोणत्याही प्रकारे निविदा प्रकाशीत करण्यात आली नव्हती. सदरची कामे १०० रु. चे स्टॅप पेपरवर (Memo Randum of Understanding) करुन करण्यात आलेली होती. याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | MOU केल्याचा दिनांक | एकुण कामे | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २४ ऑक्टोबर, २००८ | ६ कामे | २३७३१०० |
| २ | २२ डिसेंबर, २००८ | ३ कामे | २०००००० |
| ३ | १७ मार्च, २००९ | ११ कामे | ४१५६३०४ |
| | एकूण | २० कामे | ८५२९४०४ |

वरील करारनाम्यानुसार कामे करण्याचा कालावधी दि. ३१/३/२००९ ला ठरविण्यात आला होता. परंतु दि. १५/९/२००९ च्या खालील हस्ताक्षर कर्त्याच्या निरिक्षणाचा वेळी त्यामधील मोहर्ली परिक्षेत्रातील एकही कामला सुरुवात न झाल्याचे दिसल्यामुळे त्याप्रमाणे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर तसेच संस्थेला सुध्दा अवगत करण्यात आलेले होते. पांगडी येथील संकुलातील एका

इमारतीचे काम सुध्दा केवळ पायव्याची सुरुवात झाल्याचे निदर्शनास आले होते. क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारची देखरेख करण्याची जबाबदारी सोपविली नसल्याचे निदर्शनास आले होते. याबाबत सविस्तर अहवाल या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. १ नुसार मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांना अवगत करण्यात आलेले होते. सदर अहवालाचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती स्पष्ट होते की,

१) निविदा सुचना न काढताच सदरचे जवळजवळ रु. ८५.२९ लाखाचे कामे सस्थेला देण्यात आली.

२) संस्थेला काम सुरु करण्यासाठी कोणताही कार्यरंभ आदेश (Work Order) देण्यात आलेला नाही.

३) केवळ MOU करुनच संस्थेला काम करण्याचे निदर्शनास आलेले होते.

४) कामाची संपुर्ण रक्कम अग्रिमाच्या स्वरुपात देण्यात आलेले आहे.

५) संस्थेला काम देण्यापुर्वी प्रचलित पध्दतीनुसार कामाच्या रक्कमेच्या २% एवढी रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन प्रत्येक कामाचा ऐवजी घेतलेली नाही.

६) संस्थेला देय बिलातुन शासनाचे निर्देशानुसार २% रक्कम वॅट अंतर्गत वसुल करणे आवश्यक होते. जर सस्थेला विक्रीकर माफ नसेल तर ४% वॅट संस्थेकडून वसुल करणे आवश्यक ठरते.

७) संस्थेच्या देय रक्कमेतुन २% आयकर १०% सरचार्ज व ३% शिक्षण शुल्क धरुन कपात करणे व सदर रक्कम चलानव्दारे तिजोरीत भरणा करणे आवश्यक होते. तसे केले गेले दिसुन येत नाही.

उपरोक्त कामे ग्रामपयोगी विज्ञान केंद्र दत्तपुर वर्धा यांना देणेसाठी कोणत्याही प्रकारचे शासनाचे निर्देश आहे का तसेच निदर्शनास आलेल्या त्रृटी याबाबत तत्कालीन क्षेत्रसंचालक तथा वनसंरक्षक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर डॉ. एस.एच. पाटील यांना सुध्दा या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३(१)/खर्च/३९७, दि. १६/२/२००९ (प्रत जोडलेली आहे) अन्वये विचारणा करण्यात आलेली होती. परतु सदर पत्राला त्यांनी आजतागायत कोणत्याही प्रतिसाद दिलेला नाही परंतु त्यांनी पेच व्याघ्र प्रकल्पात सुध्दा अशा प्रकारची कामे करण्यात आलेली होती असे उत्तर दिलेले होत. हि बाब सुध्दा मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांना अवगत करण्यात आलेली आहे. याबाबत संस्थेला काही विशेष अधिकार असल्यास विचारणा करण्यात आलेली होती. परंतु त्यांनी सुध्दा कोणतेही उत्तर दिलेले नाही किंवा कागदपत्रे सादर केलेली नाही याबाबत शासनाचे हित लक्षात घेऊन खालील स्वाक्षरीकर्त्यांनी स्वतः सदर संस्थेमध्ये जाऊन त्यांची भेट घेऊन त्यांचेकडून उर्वरीत कामे करुन घेणेबाबत त्यांना विनंती करण्यात आलेली होती व त्यांना बिना निविदेने काम घेण्याबाबत काही विशेष अधिकार आहे का यांची विचारणा करण्यात आली होती. परंतु त्यांनी अशा प्रकारचे

आदेश नसल्याचे अवगत केले. सदर प्रकरणामध्ये कितीतरी बऱ्याच त्रुटी आहे MOU मध्ये सुरक्षा ठेव घेण्याची कोणतेही तरतुद नसल्यामुळे संस्थेचे कामात त्रुटी आल्यास कोणत्याही प्रकारची वसुली करण्याची तरतुद ठेवली नाही. संस्थेवर विहीत मुदतीत कामे करण्याची कोणतेही जबाबदारी यामध्ये टाकलेली नाही त्यामुळे संस्थेनी कामे विहीत मुदतीत पार पाडली नाही तर ती कामे करणेकरीता बाध्य करणे शक्य होत नाही. याप्रकरणामध्ये ३१ मार्च पुर्वी धनादेश काढुन देण्यात आलेले असल्यामुळे व कामे झाली नसल्यामुळे अडचणीची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु शासनाचे हित लक्षात घेऊन संस्थेकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन, प्रत्यक्ष भेट व दुरध्वनी माध्यमातुन कामे पुर्ण करुन घेतली आहे. सद्यास्थितीत बहुतांश कामे मोहर्ली येथील कामाचे फिनिशींग सुरु आहे. पुढील १५ दिवसात सदर कामे होणे अपेक्षित आहे.

याकामाचे बाबतीत इतरही बऱ्याच त्रुटी निदर्शनास आल्या होत्या- कामाची संपुर्ण रक्कम अग्रीमाच्या स्वरुपात देण्यात आली होती. सन २००८-२००९ ची कामे फरवरी/२०१० पर्यत सुरु आहे. संस्थेला देय बिलातुन शासनाचे निर्देशानुसार २ % रक्कम वॅट अंतर्गत वसुल करणे आवश्यक होते. जर संस्थेला विक्री कर माफ नसेल तर ४ % वॅट संस्थेकडुन वसुल करणे आवश्यक ठरते. संस्थेच्या देय रकमेतुन २ % आयकर व १० % सरचार्ज व २ % शिक्षण शुल्क कपात करणे व सदर रक्कम चलानद्वारे तिजोरीत भरणा करणे आवश्यक होते. परंतु तसे या कार्यालयातर्फे केले गेले नव्हते. सदरची वसुली ही शासकीय प्रचलित नियमाला धरुन असल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष ३(१)/खर्च/३६०, दिनांक १६/९/२००९ अन्वये संस्थेकडे त्याबाबतची मागणी करण्यात आलेली होती. पंरतु आजतागायत संस्थेने उपरोक्त रकमेचा भरणा केलेला नाही. त्यांनी त्यांचे पत्र क्रमांक ग्राविके/हॉऊसिंग/२००९-२०१०/१०६, दिनांक १३/१/२०१० अन्वये कळविले की, आम्हाला १२(अे) नुसार आयकर पडत नसल्यामुळे बांधकामाच्या रकमेवर आयकर आकारले जाऊ नये तसेच वॅट करसुध्दा आम्हास लागु होत नाही. (प्रत जोडली आहे). वॅट व आयकर मिळुन एकुण रककम ५.३३ लाखाचे वर शासनाकडे भरणा करणे आवश्यक होते. याबाबत विक्रीकर उपआयुक्त (वॅट प्रशासक) चंद्रपुर यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष ३ (१)/खर्च/५८२, दिनांक १७/१२/२००९ तसेच संयुक्त आयकर आयुक्त वर्धा यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष ३ (१)/खर्च/५८१, दिनांक १७/१२/२००९ अन्वये रक्कम कपात करणेबाबत कळविण्यात आले होते. सदर संस्थेला सुट असल्यास त्यांनी त्याचेकडुन सुटबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन या कार्यालयास सादर करणे बंधनकारक होते. परंतु त्यांनी तसे केले नाही. अशा प्रकारची कामे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपुर यांनीसुध्दा केलेली असल्यामुळे उपरोक्त वसुल करावयाची रक्कम त्यांचेकडुन करणेची कार्यवाही करता येईल का याबाबतचे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपुर यांना मार्गदर्शन मागितलेले

होते. व त्याची प्रत आवश्यक कार्यवाहीस पेंच व्याघ्र प्रकल्प कार्यालयास देण्यात आलेली होती. परंतु त्यांचेकडुन याबाबत कोणताही निर्णय या कार्यालयास कळविलेला नाही.

उपरोक्त कामे ऑक्टो/२००८ ते मार्च/२००९ दरम्यान देण्यात आलेली होती त्याची जबाबदारी क्षेत्रीय कर्मचा-यांना सोपविण्यात आलेली नव्हती. नंतर त्यांना तृटीसाठी जबाबदार धरणे योग्य नाही असे माझे मत आहे.

मोजमाप पुस्तिका व पुर्तता अहवाल नसणेबाबत :- सदर संस्थेकडे जी कामे सोपविली होती त्या कामाचे मोजमाप पुस्तिका तयार करण्यात आलेल्या नव्हत्या. या कामासाठी तज्ञ अश्या वनअभियंत्याची गरज असल्यामुळे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपुर यांना त्यांचे अधिनस्त असलेल्या उपवनअभियंता यांना पाठविण्याबाबत कळविले होते. याबाबत कार्यवाही झालेली नसल्यामुळे मोजमाप पुस्तिका तयार करण्यात आलेल्या नाहीत. व परिणामी कार्यपुर्तता अहवाल सुध्दा होणे बाकी आहे. कोणतेही बांधकामाचे मोजमाप पुस्तिकात भरुन त्याचे पुर्णत्वाचे अहवाल प्राप्त झाल्याशिवाय धनादेश जारी करणे योग्य नव्हते असे खालील हस्ताक्षर कर्त्याचे मत आहे.

आता संस्थेकडुन सदरच्या तृटीची पुर्तता करुन घेणे जिकरीचे काम झालेले आहे. तरी संदर्भिय पत्राला अनुसरुन अहवाल सादर करण्यात येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर

प्रतिलिपी मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपुर यांना माहितीस सविनय सादर